मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# नगरपालिका, नगरपरिषदांची मतमोजणी पुढे ढकलली; आता 21 डिसेंबरला निकाल

## माजी नगरसेवकांकडून 5,000 हून अधिक तक्रारी : फक्त 333 मतदारांनीच 'नाम गायब' झाल्याबद्दल नोंदवली हरकत!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रभागनिहाय मतदार यादीवरून गोंधळ सुरू आहे. एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात जोडण्यात आले आहेत. काही माजी नगरसेवक तसेच, उमेदवारांची नावे गायब झाली आहे. त्यावर राजकीय नेते, माजी नगरसेवक, इच्छुकांनी मोठ्या संख्येने हरकती व तक्रारी नोंदविल्या आहेत. मात्र, निवडणुकीतील महत्त्वाचा घटक असलेला मतदारराजा त्याबाबत उदासीन असल्याचे चित्र आहे. हरकती व तक्रारीकडे सर्वसामान्य मतदारांनी साफ दुर्लक्ष केले आहे. शहराचे भवितव्य ठरविणाऱ्या निवडणुकीबाबत मतदारांना काही देणे- घेणे नसल्याचे त्यावरून दिसत आहे महापालिका निवडणूक जानेवारी 2026 ला होण्याची शक्यता आहे. त्यासाठी 1 ते 32 प्रभागातील एकूण 128 जागांवर माजी

नगरसेवकांसह इच्छुक प्रचारात व्यस्त आहेत. निवडणुकीसाठी महापालिकेने प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी 20 नोव्हेंबरला प्रसिद्ध केली आहे.. इच्छुकांनी मतदार यादी विकत घेत प्रभागातून गायब झालेली मतदार नावे शोधून काढली आहेत. त्यावर महापालिकेच्या निवडणूक विभागाकडे हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. ते प्रमाण शनिवार (दि.29) पर्यंत तब्बल सव्वापाच हजारांच्या पुढे गेले आहे. पुढील तीन दिवसात बुधवार (दि.3) पर्यंत ती संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.




मतदारांना मतदान करता यावे म्हणून आपल्या फायद्यासाठी माजी नगरसेवक व इच्छुक धडपड करीत आहेत. गायब झालेली मते आपल्याला मिळावी यासाठी ते मेहनत घेत आहेत. त्यासाठी महापालिका प्रशासनाशी भांडत आहेत. निवडणुकीत एक- एक मत हे महत्वाचे असते. इच्छुक मतांसाठी सर्व प्रकाराचे प्रयत्न करताना दिसत आहेत.

असे असले तरी, निवडणुकीतील महत्वाचा घटक असलेला शहरातील मतदार राजा या प्रक्रियेपासून अलिप्त आहे. सर्वसामान्य मतदार आपले नाव मतदार यादीत आहे किंवा नाही, याबाबत सजग असल्याचे दिसत नाही. शहरातील केवळ 333 मतदारांनी आपले नाव मतदार यादीत नाही, यासाठी अ अर्ज भरला आहे. प्रत्येक प्रभागात अंदाजे किमान 2 हजार मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात जोडण्यात आली आहेत. त्यानुसार तब्बल 64 हजारांपेक्षा अधिक मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात समाविष्ट करण्यात आली आहेत. प्रत्यक्षात ती संख्या अधिक आहे. त्यानुसार प्रत्येक मतदारांने मतदार यादी तपासून हरकती नोंदविणे अपेक्षित होते. मात्र, तसे झालेले नाही. त्यामुळे शहराचे भवितव्य ठरविणार्या निवडणुकीबाबत मतदारांना काही घेणे देणे नसल्याचे दिसत आहे.

# भोसरी एमआयडीसीतील एका कंपनीत एलपीजी सिलेंडरचा स्फोट

## सहा कामगार जखम; अग्निशमन विभागाने परिस्थिती आणली नियंत्रणात

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील भोसरी एमआयडीसी परिसरातील अंबिका पावडर कोटिंग कंपनी मध्ये एलपीजी (लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस) अचानक स्फोट होऊन आग लागल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. दरम्यान, या घटनेत १ कामगार गंभीर तथा ५ कामगार किरकोळ जखमी झाले असून प्रथमोपचारानंतर पुढील वैद्यकीय उपचाराकरिता रुग्णालयात रवाना करण्यात आले आहे.

कंपनीमध्ये अचानक मोठा स्फोट होऊन आग लागली, व स्फोटाच्या मोठ्या आवाजाने तथा आगीच्या उंच ज्वाला तसेच धूर पसरू लागल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. याबाबतची माहिती परिसरातील नागरिकांनी तातडीने अग्निशमन विभागाला दिली.



घटनेची माहिती मिळताच मुख्य अग्निशमन केंद्र पिंपरी, नेहरूनगर उप अग्निशमन केंद्र आणि भोसरी उप अग्निशमन केंद्र येथील पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन विभागाच्या पथकाने परिस्थितीचा आढावा घेत जलदगतीने बचावकार्य सुरू केले. धूर आणि उष्णतेमुळे उद्भवणारा पुढील धोका लक्षात घेऊन, पथकाने सर्व जागांची पाहणी करून कंपनीतील कामगारांना सुरक्षित बाहेर काढत परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेत सुनील कुमार( गंभीर जखमी), दाऊ कुमार, सुड्डु जयस्वाल, सुरज जाटो, राहुल कुमार, रोहित कुमार हे कामगार जखमी झाले आहेत.

या कार्यवाहीमध्ये उप अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले, दिलीप गायकवाड यांच्यासह ३० अग्निशामक जवान सहभागी होते. अग्निशामक पथकांनी एकत्रित समन्वयाने बचाव व अग्निशमन कार्य सुरळीतपणे पाडले. या स्फोटाचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून अग्निशमन विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

> **औद्योगिक क्षेत्रातील कामकाजात सुरक्षा मानकांचे काटेकोर पालन न करणे ही अनेक दुर्घटनांची प्रमुख कारणे आहेत. नियमित तपासणी, उपकरणांची देखरेख आणि कामगारांना दिले जाणारे सुरक्षा प्रशिक्षण हे घटक दुर्लक्षित झाले तर असे प्रकार पुन्हा घडू शकतात. त्यामुळे औद्योगिक सुरक्षेला प्राधान्य देणे महत्वाचे आहे.**
>
> **- विजयकुमार खरोटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड, महापालिका**

# नागरिकांची तक्रार मिळताच शुभयोग सोसायटीतील स्व:खर्चाने केला परिसर स्वच्छ

## सामाजिक कार्यकर्ते तथा आपला माणूस निलेश बोराटे यांचे नागरिकांनी मानले आभार



**मोशी | प्रतिनिधी**

परिसरातील शुभयोग सोसायटी मध्ये 2 वर्षांपासून गार्डनचा परिसर खोदून ठेवलेला होता तसेच त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर झाडेझुडपे वाढलेली होती. त्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर विंचू काट्याची अडचण निर्माण झालेली होती.या घाणीमुळे आणि अडीअडचणींमुळे सापांची भीतीही त्या ठिकाणी वाढली होती. लहान मुलांना खेळण्यासाठी ही मोठी भीती या ठिकाणी वाटत होती..

ही परिस्थिती आणि सोसायटी धारकांना होणारा त्रास सोसायटी मधील नागरिकांनी त्यांच्या बिल्डरांना ही सांगितला परंतु त्यांनीही याकडे दुर्लक्ष करून, याबाबतीत सोसायटी ला कुठलीही मदत बिल्डर कडून मिळाली नाही.

असा हा 2 वर्षांपासून प्रलंबित प्रश्नासाठी सोसायटीतील नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते तथा सर्वांना आपला असा वाटणारा आपला माणूस निलेश बोराटे यांना कॉल करून सांगितला असता,त्वरित याची दखल घेऊन,कामाची तत्परता दाखवत,आपल्या स्व:खर्चाने जेसीबी, ट्रॅक्टर व मजूर पाठवून निलेश बोराटे यांनी हा सर्व परिसर स्वच्छ करून घेतला व तेथील असलेली पूर्ण घाण काढून टाकली.आता हा परिसर सुरक्षित असून लहान मुलांना खेळण्यासाठी ही अनुकूल झाला आहे.यामुळे येथील नागरिकांनीही सापांच्या भीतीपोटी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.

सामाजिक कार्यकर्ते निलेश बोराटे हे जनसामान्यांच्या समस्येसाठी सदैव तत्पर असतात.भोसरी विधानसभेचे कार्यसम्राट आमदार महेश दादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे काही ना काही समाजकार्य सातत्याने सर्वांसाठी सदैव चालू असते. शुभयोग सोसायटीतील कामाची तत्परता पाहता सोसायटीतील नागरिकांनी निलेश बोराटे यांचे आभार मानले असून त्यांच्या कार्य तत्परतेचे ही कौतुक केले आहे.

# ज्ञानदा कदम हिने श्रीमद्भगवद्गीता कंठस्थ करून मिळवली 'प्रथम श्रेणी'

## शृंगेरी शारदा पीठाचे 36 वे शंकराचार्य स्वामी भारती तीर्थ यांच्या उपस्थितीत अलौकिक कामगिरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

केवळ १० वर्षांच्या ज्ञानदा मोक्षदा सचिन कदम हिने श्रीमद्भगवद्गीता संपूर्ण कंठस्थ, मुखोद्गत करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. हिंदू धर्मातील चार मुख्य पीठांपैकी एक असलेल्या शृंगेरी शारदा पीठाचे ३६ वे शंकराचार्य स्वामी भारती तीर्थ यांच्या उपस्थितीत झालेल्या परीक्षेत तिने 'प्रथम श्रेणी' मध्ये उत्तीर्ण होऊन सिद्धी प्राप्त केली.ज्ञानदाच्या या अभूतपूर्व यशामुळे तिच्या कुटुंबीयांवरआणि शिक्षकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### १० वर्षांत साधला दैवी ठेवा

**» लहानग्या ज्ञानदाने इतक्या कमी वयात संपूर्ण श्रीमद्भगवद्गीता कंठस्थ करणे, हे तिच्या उत्कृष्ट अभ्यासू वृत्तीचे, उच्च संस्कारांचे आणि अखंड समर्पण भावनेचे प्रतीक आहे. तिच्या या कृतीने आजच्या पिढीला एक खूप मोठा प्रेरणास्रोत दिला आहे.**

या प्रवासाचा एक विशेष आणि भाग्याचा क्षण म्हणजे ज्ञानदाला गीता जयंतीच्या शुभ मुहूर्तावर उडुपी येथील गीता मंदिरात पारायण सेवाकरण्याची संधी मिळाली. ही संधी तिच्या अलौकिक साधनेची आणि मिळालेल्या दैवी आशीर्वादाची साक्ष देते. ज्ञानदा कदम हिच्या या यशामुळे तिच्या कुटुंबीयांना आणि संपूर्ण समाजाला खूप अभिमान वाटत असून. तिच्या पुढील शिक्षण आणि आध्यात्मिक वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# तळवडेतील ज्योतिबानगर लघुउद्योग परिसरात सुविधांची वाणवा

## समस्या त्वरित मार्गी लावाव्यात अशी मागणी लघुउद्योजक तसेच स्थानिक नागरिकांनी केली

**तळवडे | प्रतिनिधी**

ज्योतिबानगर (तळवडे) लघुउद्योग परिसरातील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था, सांडपाणी वाहिनी फुटली, तुटलेले चेंबर, कचरा अशा समस्यांची वाणवा असून या समस्या त्वरित मार्गी लावाव्यात अशी मागणी लघुउद्योजक तसेच स्थानिक नागरिकांनी केली आहे. दरवर्षी महापालिकेला कर भरतो मात्र सोयी-सुविधा मिळत नसल्याने लघुउद्योजकांनी नाराजी व्यक्त केली आहे. तळवडे (ज्योतिबानगर) परिसरात मोठ्या प्रमाणात लघुउद्योग आहेत. मात्र, या संपूर्ण औद्योगिक वसाहतीतील अंतर्गत रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. अनेक रस्त्यांचे डांबरीकरण झालेले नाही. काही भागांत सांडपाणी वाहिनी फुटल्याने पाणी रस्त्यावर वाहत असून, वाहनचालकांना तसेच पादचाऱ्यांना त्रास होत आहे. सांडपाण्यामुळे आणि तुटलेल्या चेंबरमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. या मार्गावरून रोज मोठ्या संख्येने कामगार दुचाकी व पायी प्रवास करतात. खड्डे, पाणी आणि असमतोल रस्त्यांमुळे त्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात तर या रस्त्यांची अवस्था अधिकच बिकट होते. परिसरातील रस्ते अत्यंत अरुंद असून, त्यावरून अवजड वाहने, टेम्पो, ट्रक जाताना लघुउद्योगांना तसेच स्थानिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या परिसरात सर्व रस्ते डांबरीकरण करून दुरुस्ती करावी, अशी मागणी लघुउद्योजक व स्थानिक नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.





**तळवडे महापालिकने ज्योतिबानगर लघुउद्योग परिसर पूर्ण वाळीत टाकला आहे. ड्रेनेज, रस्ते, कचरा व्यवस्थापन याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. याचा त्रास लघुउद्योजकांना भोगावा लागतो आहे.**

**- इंद्रकुमार चौधरी (उद्योजक)**

उद्योजक कीर्ती शहा म्हणाले, "ज्योतिबानगर परिसरात मोठी औद्योगिक वसाहत विकसित होत आहे. पण पायाभूत सुविधांचा गंभीर अभाव आहे. अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण, ड्रेनेज आणि चेंबर दुरुस्ती तातडीने करणे आवश्यक आहे. वाहतुकीतील अडथळ्यांमुळे वेळेवर ऑर्डर पूर्ण करण्यात वाहतुकीचा अडथळा ठरत आहे."

# नवले ब्रिज दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्गावर तात्काळ 5 उपाययोजना कराव्यात : डॉ. नीलम गोऱ्हे

## विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विभागीय आयुक्त कार्यालयात तातडीची आढावा बैठक घेतली.

**पुणे | प्रतिनिधी**

मुंबई–बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील नवले ब्रिज परिसरात वारंवार होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेत विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी) विभागीय आयुक्त कार्यालयात तातडीची आढावा बैठक घेतली. सदर महामार्गावरील वाहतूक सुरक्षिततेसाठी, नवा रिंगरोड प्रकल्प पूर्ण होईपर्यंत प्रशासकीय यंत्रणेने तत्काळ राबवावयाच्या पाच महत्त्वपूर्ण उपाययोजना घोषीत कराव्यात, अशा ठोस सूचना त्यांनी बैठकीत केल्या.

या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे विभागीय उपायुक्त तुषार ठोंबरे, पुणे अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, विभागीय उपायुक्त तुषार ठोंबरे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प अधिकारी संजय कदम, पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांचे वरिष्ठ अभियंते, वाहतूक पोलीस, तसेच संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





### स्थिर चौकीची स्थापना

» अपघातप्रवण झोनमध्ये मोबाइल चेकपोस्ट किंवा स्थिर चौकीची स्थापना करता येईल का याबाबत नियमांनुसार तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः भारी वाहनांचे वेग नियंत्रण, ब्रेक कंडीशन, ओव्हरलोडिंग यावर नजर ठेवण्यासाठी हे केंद्र प्रभावी ठरतील, असे उपसभापतींनी सांगितले.

### उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी

» बैठकीदरम्यान उपसभापतींनी प्रशासनाला सांगितले की, नवले ब्रिज परिसरातील अपघातांची मालिका थांबवण्यासाठी जबाबदारी निश्चित करून एक आदर्श नमुना तयार करावा. प्रशासनाने या सर्व उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, येत्या २६ किंवा २७ डिसेंबर रोजी आपण या संदर्भात आढावा घेणार असल्याचे त्यापूर्वी याबाबीवरचा कार्य अहवाल ठेवावा असे निर्देश दिले.

### स्वतंत्र पथक तयार करण्याचे निर्देश

» पाचव्या उपाययोजनेत जवळच फायर ब्रिगेडची सुविधा उपलब्ध ठेवणे, रेस्क्यू टीम तैनात करणे, तसेच अपघातानंतर 'गोल्डन अवर'मध्ये मदत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र पथक तयार करण्याचे निर्देश दिले. याशिवाय ट्रक मालक असोसिएशनची बैठक घेऊन ड्रायव्हर ट्रेनिंग, उतारावरील गतीनियंत्रण, वाहनांची नियमित तपासणी अशा मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यासही सांगितले.

बैठकीत नवले ब्रिज परिसरातील अपघातांच्या पुनरावृत्तीची कारणमीमांसा, वाहतूक कोंडी, ट्रक व भारी वाहनांची अनियंत्रित गती, घाट आणि उतारातील वाहन नियंत्रण यावर सविस्तर चर्चा झाली. अनेक अपघातांमध्ये वाहनांच्या वेगावरील अपुऱ्या नियंत्रणामुळे मोठी जीवितहानी झाल्याचे लक्षात घेऊन उपसभापतींनी पुढील उपाययोजनांचा अवलंब करण्याचे आदेश दिले.

यामध्ये सर्वप्रथम, सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचा आधार घेत स्पीड कमी करण्यासाठी सुसंगत रबर स्पीड ब्रेकर किंवा रंबल स्ट्रिप्स बसवण्यावर भर देता येईल. रस्ता ओला असताना वाहनांच्या घसरण्याचे प्रमाण वाढते, त्यामुळे हे स्ट्रिप्स संपूर्ण सुरक्षा मानकांनुसार बसवावेत, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली.

दुसरे म्हणजे, वाहतूक कोंडी निर्माण झाल्यानंतर तातडीने परिस्थिती हाताळण्यासाठी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. रात्री वा पावसाळ्यात अपघात झाल्यास कोंडी वाढू न देता वाहन प्रवाह सुरळीत ठेवण्यासाठी पोलिस, महामार्ग प्राधिकरण आणि मनपांच्या पथकांमध्ये समन्वय वाढवण्याची गरजही बैठकीत व्यक्त झाली.

तिसरे म्हणजे, अपघातप्रवण झोनमध्ये मोबाइल चेकपोस्ट किंवा स्थिर चौकीची स्थापना करता येईल का याबाबत नियमांनुसार तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः भारी वाहनांचे वेग नियंत्रण, ब्रेक कंडीशन, ओव्हरलोडिंग यावर नजर ठेवण्यासाठी हे केंद्र प्रभावी ठरतील, असे उपसभापतींनी सांगितले.

---

# पुणे विमानतळ देशात 'टॉप 20 मध्ये; आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतुकीत मिळवले 19 वे स्थान...

## देशात सर्वात वेगाने विकसित होत असलेल्या शहरांपैकी एक असलेल्या पुण्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

देशात सर्वात वेगाने विकसित होत असलेल्या शहरांपैकी एक असलेल्या पुण्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतुकीच्या दृष्टीने देशातील प्रमुख विमानतळांच्या यादीत पुणे विमानतळाने १९ वा क्रमांक पटकावून 'टॉप २०' मध्ये स्थान मिळवले आहे. ही रँकिंग अलीकडेच ब्युरो ऑफ इमिग्रेशनने जाहीर केली.




लोहगाव येथे असलेले पुणे विमानतळ हे प्रामुख्याने संरक्षण खात्याच्या अखत्यारीत असून, विमानांच्या टेकऑफ आणि लँडिंगसाठी वायुदलाची धावपट्टी वापरण्यात येते. त्यामुळे विमानतळाच्या विस्ताराला नैसर्गिक मर्यादा येतात. या सर्व कार्यात्मक अडचणी असतानाही पुणे विमानतळाने १९ वा क्रमांक मिळवला आहे. पुणे विमानतळाहून दुबई आणि बँकॉक अशा केवळ दोन सेवा सुरू असताना देखील पुण्याने १९ वे स्थान मिळवणे हे उल्लेखनीय यश ठरले आहे. ही रँकिंग पुणे विमानतळावर सुरू असलेल्या विविध विकासकामे आणि आंतरराष्ट्रीय संपर्क वाढविण्याची पुण्याची क्षमता आणि संधीही दाखवते.

पुणे शहर हे आधीच माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील मोठे केंद्र म्हणून ओळखले जाते आणि त्याचबरोबर चाकण एमआयडीसीमधून अनेक

> "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील नागरी विमान वाहतूक क्षेत्रात अभूतपूर्व वाढ झाली आहे. गेल्या ११ वर्षांत केंद्र सरकारने अनेक नवी विमानतळे उभारली, तसेच विद्यमान विमानतळांवरही मोठ्या प्रमाणावर उन्नतीकरणाची कामे करण्यात आली. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ त्याचे उत्तम उदाहरण आहे. गेल्या काही वर्षांत विमानतळावरील सुविधा आंतरराष्ट्रीय प्रवाशांच्या अपेक्षांनुसार मोठ्या प्रमाणात उन्नत झाल्या आहेत."
>
> - मुरलीधर मोहोळ ,केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री

आंतरराष्ट्रीय वाहन कंपन्या कार्यरत असल्यामुळे पुणे 'ऑटोमोबाईल हब' म्हणूनही झपाट्याने विकसित होत आहे. विमानवाहतूक तज्ञांच्या मते, विद्यमान टर्मिनलचे उन्नतीकरण झाल्यामुळे प्रवाशांची सोय मोठ्या प्रमाणात वाढली आहे. एरोमॉलसारख्या सुविधा व विस्तारित टर्मिनल इमारत उपलब्ध झाल्यामुळे प्रवाशांना आता सुलभ आणि सोयीसुविधांनी युक्त प्रवासाचा आनंद मिळत आहे. देशात सर्वात वेगाने विकसित होत असलेल्या शहरांपैकी एक असलेल्या पुण्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# चाकण लवकरच 'महानगरपालिका' होणार?

## "चाकणला बारामतीसारखी साथ द्या, मी विकास करून दाखवतो"- अजित पवारांचे चाकणकरांना भावनिक आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

चाकण शहरात औद्योगिकरणामुळे लोकसंख्या भरमसाठ वाढली आहे. त्यामुळे येथे अनेक प्रश्न निर्माण झाली आहेत. काही दिवसांत चाकण महानगरपालिका म्हणून विकसित करावी लागेल असे सुतोवाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चाकण येथे बोलताना केले.चाकण नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने नगराध्यक्ष पदाचे व नगरसेवक पदाचे उमेदवार निवडणुकीमध्ये उभे केले आहेत

त्यांच्या प्रचारार्थ विजयी संकल्प सभेचे आयोजन महात्मा फुले मार्केट यार्ड चाकण येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अजित पवार गट यांच्यावतीने करण्यात आले होते. त्यावेळी पवार बोलत होते. माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार भाग्यश्री वाडेकर व इतर नगरसेवक पदाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सभा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी माजी आमदार दिलीप मोहिते व पक्षाचे नगराध्यक्ष व नगरसेवक पदाचे उमेदवार स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बोलताना सांगितले की, आमच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार ह्या सुसंस्कृत व त्यांना राजकीय वारसा आहे. चाकण शहरात औद्योगिकरणामुळे लोकसंख्या भरमसाठ वाढली आहे. त्यामुळे येथे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

मध्यप्रदेश शहरातील इंदूर शहरासारखी पुणे जिल्ह्यातील तीन शहर निवडण्यात येणार होते. त्यात चाकण शहराची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे कचरा समस्यांचे पूर्ण निवारण करण्यात येणार आहे. चाकण म्हणजे मिनी भारत आहे. येथे इंडस्ट्रीज वाढत आहे. उद्योगधंदे नवनवीन या भागात येत आहेत.

बारामतीने 35 वर्षे मला साथ दिली. कसलीही लाट येवू द्या बारामती फक्त दादा म्हणतात. तशी साथ तुम्ही मला द्या. मी बारामतीचा विकास केला तसा आम्ही तुमचा करू. तुम्ही बारामती सारखी आम्हाला साथ द्या मी शब्दाचा, कामाचा पक्का आहे. मी पुणे जिल्ह्यातील आहे. त्यामुळे बाहेरील कोणी येईल मी हे करू ते करू असे सांगून जातील. पण आपल्याला आपल्या समस्या माहीत आहे.



### पुणे जिल्ह्यातील तीन शहरांची निवड

» येथे कचरा समस्या, पाणी टंचाई, ट्रॅफिक समस्या, लोकांना राहणा-यासाठी घरे बांधण्यात येणार आहेत. कचऱ्या समस्या निवारण बाबत मध्यप्रदेश शहरातील इंदूर शहरासारखी पुणे जिल्ह्यातील तीन शहर निवडण्यात येणार होते. त्यात चाकण शहराची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे कचरा समस्यांचे पूर्ण निवारण करण्यात येणार आहे.चाकण म्हणजे मिनी भारत आहे. येथे इंडस्ट्रीज वाढत आहे. उद्योगधंदे नवनवीन या भागात येत आहेत.

### डीपीआरचा प्रश्न लवकर सोडवणार

» येत्या काही दिवसांत चाकण महानगरपालिका म्हणून विकसित करावी लागेल. मी स्वतः ट्रॅफिकच्या प्रश्नासाठी स्वतः लक्ष घातले आहे. आता पावसाळा संपला आहे. रस्त्याचे काम लवकर सुरू करण्यात येईल. चाकण शहरात डीपीआरचा एक प्रश्न निर्माण झाला आहे. मी पालकमंत्री आहे याबाबत तो प्रश्न लवकरात लवकर मार्गी काढण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

### बारामती सारखी आम्हाला साथ द्या

» बारामतीने 35 वर्षे मला साथ दिली. कसलीही लाट येवू द्या बारामती फक्त दादा म्हणतात. तशी साथ तुम्ही मला द्या. मी बारामतीचा विकास केला तसा आम्ही तुमचा करू. तुम्ही बारामती सारखी आम्हाला साथ द्या मी शब्दाचा, कामाचा पक्का आहे. मी पुणे जिल्ह्यातील आहे. त्यामुळे बाहेरील कोणी येईल मी हे करू ते करू असे सांगून जातील. पण आपल्याला आपल्या समस्या माहीत आहे.

# लोणी काळभोर हादरले! घरात सिलिंडरचा भीषण स्फोट; दोघेजण गंभीर जखमी

## सिलेंडर, गिझर की फटाके? स्फोटाचे नेमके कारण अस्पष्ट, फॉरेन्सिक टीमकडून घटनास्थळाची तपासणी सुरू.

**पुणे | प्रतिनिधी**

घरगुती सिलेंडरमधून गॅस गळती होऊन अचानक स्फोट झाल्यामुळे घरात एकटीच असलेली महिला भाजून गंभीर जखमी झाली आहे. या स्फोटामुळे पहिल्या मजल्यावरील घराची खिडकी तुटून खाली रस्त्यावर पडल्याने दुचाकीवरून चाललेला एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील नेहरू चौकाजवळ असलेल्या जगताप हाईट्स इमारतीत आज सकाळी सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास घडली.

करूणा मनोज जगताप (41) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. तर जखमी झालेल्या तरुणाचे नाव समजले नाही. दोघांनाही रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, करूणा जगताप या घरात एकट्याच होत्या. सकाळी गॅस गळती होऊन मोठा स्फोट झाला. दिवाळीला आणलेले फटाके घरात शिल्लक राहिले होते.

ते ही यावेळी जोरात वाजले. या स्फोटात करूणा जगताप या होरपळल्या. हा स्फोट इतका भयंकर होता की, घराचे दरवाजे, खिडकी तुटून पडले. तर घरातील काही वस्तू जळून गेल्या. यावेळी रस्त्यावरून दुचाकी चालली होती. त्याचवेळी हा स्फोट होऊन खिडकी खाली पडून एका तरुणाच्या हाताला गंभीर मार लागला आहे.

घटनेची माहिती मिळताच, लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक स्मिता पाटील, सहायक पोलीस निरीक्षक अंकुश बोराटे, उपनिरीक्षक पूजा माळी, सहायक फौजदार रामदास मेमाणे, हवालदार मंगेश नानापुरे, मल्हारी ढमढेरे तसेच लोणी काळभोरचे सरपंच नागेश काळभोर हे तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने आग विझवली.



### स्फोटाचे नेमके कारण अस्पष्ट

» दोन्ही जखमींना तत्काळ महाराजा रुग्णवाहिकेच्या माध्यमातून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. करूणा जगताप यांची प्रकृती गंभीर तर तरुणाचा हात फ्रॅक्चर झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.सिलेंडरमधून गॅस गळती, गिझर स्फोट, फटाके वाजल्याने की अन्य कोणत्या कारणाने हा स्फोट झाला आहे. याचे खरे कारण अद्याप समोर आलेले नाही. घटनास्थळाची तपासणी पोलीसांच्या फॉरेन्सिक टीम केली आहे. त्यांच्या तपासातून स्फोटाचे नक्की कारण समजेल. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस करत आहेत.